जळगाव तरुण भारत
Main Edition | 2023-10-21 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

# विद्यापीठात राष्ट्रीय सायबर सुरक्षा सप्ताहास सुरवात



**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळा व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात 'राष्ट्रीय सायबर सुरक्षा माह' अंतर्गत शुक्रवार २० ऑक्टोबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात जळगाव सायबर पोलिस स्टेशनचे पो. उपनिरीक्षक डिगंबर थोरात यांनी विविध प्रकारच्या ऑनलाईन सायबर धोके तसेच ते कशापध्दतीने रोखता येतील याबाबत माहिती दिली. पोलीस नाईक सचिन सोनवणे यांनी फोटा म ॉर्फिन, सायबर बुलयिंग, सेक्सटींग इ. गुण्याबद्दल माहिती देवून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी दोन नाटीका सादर केल्यात. या कार्यक्रमात 'सायबर फ्रॉडपासून सावध व्हा, सांगतोय आपला पोलिस बाप्पा' या गाण्यावर पोस्टर्स प्रेझेंटेशन झाले व सायबर सुरक्षेची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली.

यावेळी संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक व व्य.प. सदस्य प्रा.एस.आर.कोल्हे, प्रा. राजीव आमले, प्रा. एस.व्ही. कापसे, प्रा. मनोज पाटील, प्रा. अजय सुरवाडे उपस्थित होते. सूत्रसंचालन गौरव चौधरी व गायत्री ठाकरे यांनी तर आभार आशिष पाटील यांनी मानले.

Powered by iDocuments